# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय
# ता.सावंतवाडी

ई-मेल - tmosawantwadisindhu@gmail.com

जा.क्र.ताआअका/दरपत्रक नोटीस/ ६६४ /२०२६, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ता.सावंतवाडी, दिनांक - ०६/०१/२०२६ ०७

## दरपत्रक नोटीस

सावंतवाडी तालुक्यातील १७० आरोग्य कर्मचारी, १२९ आशा स्वयंसेविका व ५ गटप्रवर्तक यांचे प्रशिक्षण टप्याटप्याने माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या कालावधीत निवासी प्रशिक्षण आयोजित करावयाचे आहे. तसेच तालुकास्तरीय आढावा सभा व इतर आरोग्य विषयक कार्यक्रमासाठी हॉल भाडयाने घेणेचा आहे. तरी सदरच्या प्रशिक्षणासाठी प्रती बॅच ३० आशा स्वयंसेविका यांची एक बॅच ३ प्रशिक्षकामार्फत निवासी प्रशिक्षण आयोजित करावयाचे आहे. तरी सदरच्या प्रशिक्षणासाठी व इतर आरोग्य विषयक कार्यक्रमासाठी हॉल (बैठकव्यवस्थेसाठी खुर्ची, लाईटव्यवस्था, दोन टेबल, ब्लॅकबोर्ड, पिण्यासाठी पाणी व संडास व बाथरुम व्यवस्था इ.सोयी) ची आवश्यकता आहे. तसेच सदरच्या प्रशिक्षणासाठी ठराविक दिवस निवास व्यवस्थेची आवश्यकता आहे. तरी इच्छुकाकडुन सिलबंद दरपत्रक या कार्यालयाकडे दि.१५/०१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावीत. दरपत्रकामध्ये हॉल भाडे दर व निवास व्यवस्था दर स्वतंत्रपणे नमुद करावेत.

सदरचे प्रशिक्षण आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांचे सोईनुसार सावंतवाडी व बांदा शहरात टप्याटप्याने दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत आयोजीत करणेत येणार आहे.

दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणीपत्रकावर नमूद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.

देयकाची रक्कम संबधीत मक्तेदाराच्या बॅक खातेवर पीएफएमएस प्रणालीनुसार जमा करणेत येईल.

मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**<u>दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण</u>**

01) तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी नोटीसबोर्ड
02) www.nrhm.maharashtra.gov.in
03) www.arogya.maharashtra.gov.in

**वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**

Scanned with CamScanner